## संस्थापकीय ...

भारतातील सर्वोच्च समजली जाणारी केंद्रीय नागरी सेवा व इतर सेवासाठींची परीक्षा. या सेवेसाठी परीक्षा देणारे व परीक्षा घेणारे त्या त्या क्षेत्रातील तरबेज व्यक्तिमत्त्वे. खरतर अशा वेगवेगळ्या परीक्षा ह्या बालपणापासून ते संबंधीत शिक्षण घेईपर्यंत ज्याचे त्याचे परीने दिल्या जातात. अशा परीक्षा देणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षार्थींचे मुल्यमापन हे दरवेळी, दरवर्षी वेगवेगळ्या परीक्षकांकडून होत असते. दरवर्षी पहिल्या येणाऱ्यांची काही वर्षांनी परत एकदा तशीच परीक्षा घेतली तरी त्यामध्ये पण पहिले कोणतरी येणार आणि शेवटचे कोणीतरी !

माणसाने तयार केलेल्या व माणसाने दिलेल्या परीक्षांचा निकाल किंवा निर्णय लागतो. निसर्गातील परीक्षांमध्ये मात्र लोकांना न्याय अपेक्षित असतो. हा न्याय सुध्दा माणसाला निसर्गाने बहाल केलेल्या तोकड्या मापदंडावर अपेक्षित असतो. काही परीक्षा तयारी करून द्याव्या लागतात तर काही परीक्षा तयारी नसतानाच घेतल्या जातात, द्याव्या लागतात. प्रचलित परीक्षा न देताच काहीजण त्या त्या क्षेत्रात आदर्शवत कार्यही करतात. याउलट प्रचलित परीक्षा उत्तम प्रकारे देणारे अपवादात्मक परिस्थितीत कमी पडतानाही दिसतात. परीक्षा ही पात्रता मोजण्यासाठी असेल तर ज्यांची परीक्षाच घेतली जात नाही, त्यांची पात्रता काय असावी बरे ?

निसर्गातील पंचतत्त्व व अनेक वर्षांची उत्क्रांती (निसर्गाचीच प्रक्रिया) यामधून मानवाची निर्मिती झाली. निसर्गाकडूनच मानवाने शिक्षण घेतले व मानव स्वत:ला निर्माण करणाऱ्या निसर्गाचेच व ब्रम्हांडाचे मोजमाप करू लागला. या मोजमापामधून त्याला जे गवसले किंवा हरवले यामधून त्याने स्वत:साठी समाज परत्वे मापदंड तयार केले.

कौरव पांडवांच्या वेळी लोकशाहीचे मापदंड नव्हते, ते जर तेंव्हा असते तर पांडवांच्या ऐवजी कौरवच विजयी झाले असते. कारण कौरवांची व त्यांच्या बाजूने लढणाऱ्यांची संख्या ही पांडवांच्या व त्यांच्या बाजूने लढणाऱ्यांच्या संख्येपेक्षा फार मोठी होती. उघड मतदान झाले असते तर कौरवच विजयी झाले असते. त्यावेळच्या मापदंडानुसार पांडव विजयी झाले. काही लोक म्हणतात ' शेवटी सत्याचा विजय होतो ', तर मग शेवटापर्यंत अखंड विजय कोणाचा होत असतो ?

असे तर नाही ना ? नाव 'नदी ' पण असते काय ? . . . पाणी !

आजचे मापदंड वेगळे आहेत. वेगवेगळ्या देशांचे वेगवेगळे मापदंड आहेत. ब्रिटीश साम्राज्याच्या ट्राफलगार चौक, लंडन येथील पुतळ्याखाली एक वाक्य लिहीलेले आहे, ते असे - 'Britan expects everybody should do his duty.' तसेच अलिकडे जगावर हुकूमत गाजवणाऱ्या अमेरिकेचे तेंव्हाचे प्रसिध्द राष्ट्रपती जॉन केनेडी जनतेला उद्देशून म्हणायचे - 'देश तुम्हाला काय देतो यापेक्षा तुम्ही देशाला काय देता हे महत्त्वाचे'

भारतात आज २८ राज्ये आहेत, पुढे ती वाढतीलही. भारतातील प्रत्येक राज्यांची साऱ्या जगाला चांगले देण्याची क्षमता आणि पात्रता आहे. आपल्या सर्व राज्यांमधील चांगले एकत्र करून आपल्या देशाचे आपण मापदंड निर्माण केले तर भारत महासत्ता म्हणून लवकर उदयास येईल. इतरांना देण्याबरोबरच आपण स्वत:ही घेणे व तसे आचरणात आणणे मात्र महत्त्वाचे असते.

आपण Unity in diversity वरती विश्वास ठेवतो. यु.पी.एस.सी. बाबतीतही राज्यनिहाय असा विचार व्हावा असे वाटते. मानवी शरीरातच तीन प्रकारची घड्याळे असतात व प्रत्येक घड्याळाचे आवर्तन वेगवेगळे असते.

१) पहिले घड्याळ - शारीरीक (Physical Biorhythm) - २३ दिवसांनी आवर्तन पूर्ण होते.
२) दुसरे घड्याळ - भावनात्मक (Emotional Biorhythm) - २८ दिवसांनी आवर्तन पूर्ण होते.
३) तिसरे घड्याळ - बौध्दीक (Intellectual Biorhythm) - ३३ दिवसांनी आवर्तन पूर्ण होते.

जेंव्हा या तिन्हीही घड्याळांची लयबध्दता जमते तेंव्हाच मानवास प्रसन्नता येते. तसेच कांही सशक्त भासतात कारण कारण बाकीचे अशक्तपणाचे प्रदर्शन करतात म्हणून, याचीही जाणीव असावी. भारतमातेसाठी तिच्या लेकरांनी अशी लयबध्दता जोपासली पाहिजे.

जग म्हणजे काय ? ... ज म्हणजे जन्माला येणे आणि ग म्हणजे गमन करणे. ज आणि ग यामधला कालखंड म्हणजे जीवन ! या जगात आपण आलो आहोत तर जगामधील सुधारणा प्रक्रियेत थोडी का होईना मदत करूनच हे जग सोडावे. सुर्य कधी उगवतही नाही आणि मावळतही नाही, आपले मापदंड मात्र तसे म्हणतात. कार्य करणेस भरपूर वाव आहे कारण भारताचेच प्रामुख्याने दोन भाग पडतात १) इंडिया - लोकसंख्या २५ ते ३० कोटी, २) भारत - लोकसंख्या ९० ते ९५ कोटी.

सुराज्य फौंडेशन, वारणानगरच्या विविध उपक्रमातही नेहमी संख्यात्मक व गुणात्मक सुधारणा होत राहील. भारतातील सर्व राज्यांनी अशा स्वरूपाचे किंवा याहून चांगले कार्य केले तर प्रशासनाची घडी ताबडतोब बसेल याची खात्री वाटते.

श्रावण शुक्लपक्ष, प्रतिपदा
बुधवार, ७ ऑगस्ट २०१३

**मान.आम. विनय कोरे(सावकर)**
संस्थापक , सुराज्य फौंडेशन,
वारणानगर.

## संस्थापकीय ...

युपीएससी परीक्षेमध्ये यश मिळवून ज्यांनी देशसेवेची संधी प्राप्त करून घेतली आणि स्वत: बरोबर इतरांनाही प्रोत्साहीत केले याचा आनंद वाटतो. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत अनेक क्षेत्रातील उच्च प्रतीच्या प्रशासन सेवांसाठी दरवर्षी परीक्षा घेतल्या जातात. देशातील विविध राज्यांमधून अशा परीक्षा देऊन लाखो उमेदवार आपले भवितव्य अजमावत असतात. महाराष्ट्र शासन स्तरावर, संस्थात्मक पातळीवर, सामाजिक संघटनांमार्फत अशा परीक्षेंच्या यशस्वी मार्गदर्शनासाठी प्रयत्न केले जात आहेत याचे कौतुक आहे.

माणसं जन्माला येतात आणि निघून जातात, पण चांगल काही करायला मिळणं याला भाग्य लागतं असे काहीजण म्हणतात. मानवी जीवनाची कृतार्थता दोन गोष्टीत असते. एक - इष्ट - जीवनात व्यक्तीगत आत्मोन्नतीसाठी जे केले जातं ते इष्ट. दोन - आपूर्त - लोककल्याणासाठी कार्य करणं, लोकांचेसाठी चांगले निर्माण करणे, समाज व राष्ट्राचे हिताचा विचार करणं व तसे वागणं . . . यातच मानवजन्माची कृतार्थता असते.

संस्कृतीची आठ अंगे म्हणजे धर्मकारण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण, विज्ञान, वाड:मय, कला आणि शिक्षण. जशा नाण्याला दोन बाजू असतात तशाच दोन बाजू संस्कृतीच्या प्रत्येक अंगालाही असतात. नाण्याच्या दोन बाजूंबरोबरच तीसरी जाडीची बाजूही असते, तसा संस्कृतीच्या बाबतीतही विचार होणे गरजेचे आहे.

आजच्या काळात जगात कोणत्याही देशाची शक्ती फक्त सैन्यबळावर निर्भर नसते. राष्ट्रशक्तीचे मापदंड बदलत चालले आहेत. ज्ञानशक्ती, अर्थशक्ती, औद्योगिकशक्ती, वैज्ञानिकशक्ती, युवाशक्ती, लोकशक्ती आदी राष्ट्रशक्तीचे नवे मापदंड ठरत आहेत. याबरोबरच मानसिकशक्ती (Will Power), आध्यात्मिक शक्ती(Spiritual Power ), शिक्षाशक्ती (Educational Power), महत्वाच्या भूमिका बजावतात. समाजाची बौध्दीक स्थिती (Intelligent state) व भावनिक स्थिती (Emotional state) यांचेही संतुलन रहाणे / ठेवणे महत्वाचे. जशी शारीरीक योग्यता (Physical fitness) ठेवली जाते तशी भारतमातेची सर्वांगांनी योग्यता (Allround fitness) तीच्या भूमीपुत्रांनी राखली / ठेवली पाहिजे.

देशाने मला कांही दिले पाहिजे हा विचार सोडून मी देशासाठी काय चांगल देईन ते ठरवून प्रत्येकाने दिले पाहिजे. माझ्या कांही करण्याने काय फरक पडणार? हा विचार सुध्दा मनाला शिवता कामा नये. अनेक व्यक्तीरत्नांनी ते सिध्दही करून दाखविले आहे हे नेहमी लक्षात असू द्यावे. विविध पातळीवर व क्षेत्रांमध्ये कार्य करताना प्रत्येक घटकाचे ध्येय एकच व निर्धार पक्का असेल तर ठरवलेले साध्य करण्यास फार सोपे जाते. असे कार्य करणाऱ्यांचे सामुहीक ध्येय व वैयक्तीक ध्येय जर एकच असेल तर प्रगती निश्चित याउलट जेथे सामुहीक ध्येय व वैयक्तीक ध्येय भिन्न असते तेथे मात्र अधोगती निश्चित.

श्रीमद्‌भगवत गीतेमध्ये(आपल्या संस्कृतीमध्ये) म्हटले आहे ' कर्मण्येवाऽ धिकारस्ते मा फलेषु कदाचन l ' तसेच कर्मफळ हे केवळ कर्मावर आधारीत नसून जादाचे पाच कसोट्यांवर मापले जाते. एक - उद्देश/हेतू/प्रेरणा - चांगला व योग्य पाहीजे. दोन - चिंतन - प्रत्यक्ष कर्म करीत असताना त्याचे चिंतन महत्वाचे. तीन - पध्दत - कर्म करण्याची पध्दत सर्वमान्य व निसर्गमान्य असावी. चार - परिणाम - अंतिमत: योग्य व चांगला पाहिजे. पाच - परस्थिती - तेच कर्म भिन्न परस्थितीत वेगळे फळ देते. कोणतेही कर्म छोटे वा मोठे न मानता प्राप्त परस्थितीत ते निष्ठेने व योग्य ध्येयाने केल्यास सर्वांगाने सहाय्यभूतच ठरते.

ध्येय प्राप्त करण्यासाठी समरसता / एकरूपता महत्वाची असते. कर्ममार्गी म्हणजे कर्मयोगी, म्हणतात - मी कर्मासाठी आहे(अहं ब्रम्हास्मी). भक्तीमार्गी म्हणजे भक्तीयोगी, म्हणतात - कर्म माझे आहे(तत्वूमसी). ज्ञानमार्गी म्हणजे ज्ञानयोगी, म्हणतात - मी व कर्म एकच आहे(सर्व खल्विदं ब्रम्हं) - हीच ती समरसता / एकरूपता.

सुराज्य फौंडेशन, वारणानगर मार्फत हायस्कूलस्तरावर सुरू असलेला देशातील पहिलाच ' सुराज्य स्पर्धा परीक्षा फाऊंडेशन कोर्स ', या कोर्समध्ये महाराष्ट्रातील अनेक हायस्कूल्स् मधील विद्यार्थी / विद्यार्थीनी सहभागी आहेत आणि जीवनातील कोणत्याही स्पर्धेला समर्थपणे सामोरी जाण्याची ते ग्वाही देतात. या कोर्सची व्याप्ती भारतभर व्हावी हा हेतू, जेणेकरून देशसेवेसाठी उच्च प्रतीचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होईल. सदरचा कोर्स ही एक प्रक्रिया असून प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे सर्व प्रकारच्या लोकांच्या प्रगतीस उपयुक्त असाच आहे.

सुराज्य फौंडेशनमार्फत अनेक उपक्रम / कार्यक्रम उत्तमप्रकारे सुरू असून त्याची प्रचिती सर्व स्तरातून सातत्याने येत असते. विविध विषयांवरील साहीत्य, कार्यक्रमांच्या / उपक्रमांच्या डिव्हीडीज्, मुलाखत संग्रह.. आदी संदर्भ आपणा सर्वांना निश्चितच उपयोगी आहेत.शुभेच्छा...!

बुधवार
२५ जूलै, २०१२

**मान.आम. विनय कोरे(सावकर)**
संस्थापक , सुराज्य फौंडेशन,
वारणानगर.